N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0571 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/09/2022 16:42 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरम्यानी दिन **Date From (दिनांक पासून):** 12/08/2022

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/09/2022

**Time From (वेळेपासून):** 18:09 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/09/2022 **Time (वेळ):** 16:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 030 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/09/2022 16:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 03 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गाझी नगर येथील जनजन चाईल्ड केअ, नंदुरबार ,नंदुरबार , 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** एंजनी नुजा नाईक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु इसाईनगर, पो धानोरा, ता न,नंदुरबार ,नंदुरबार ,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,425412, भारत |
| 2 | स्थायी पता | मु इसाईनगर, पो धानोरा, , इसाईनगर, पो धानोरा,नंदुरबार ,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र, 425412,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9766134938

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश दिलीप भामरे आ लो से जिल्हा परीषद | | | 1. घोडदे ता साक्री जि धुळे ,साक्री ,साक्री ,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-424304 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी केलेली रक्कम 10000/रूपये | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि अन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार दिनांक 05/09/2022मी सौ. एंजनी नुजा नाईक, वय-38 वर्षे, व्यवसाय- प्रभाग समन्वयक (जिल्हा परिष्द, नंदुरबार अंतर्गत महाराष्ट राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान), रा. मु. इसाईनगर, पो. धानोरा, ता. जि. नंदुरबार. मो.नं. 9766134938 (जिवो) मी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, वरील ठिकाणी मी माझे पती श्री. अजित करणसिंग वसावे यांचेसोबत राहते व कंत्राटी नोकरी करून उदरनिर्वाह करते. महाराष्ट राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत माझी जिल्हा परिशद, नंदुरबार कार्यालयाव्दारे दिनांक 17/09/2019 रोजी 11 महिन्याचे करारावर नियुक्ती झालेली आहे व सदर कराराचे प्रत्येक वर्शी नुतनीकरण केले जाते. दिनांक 12/08/2022 रोजी मी अन्टी करप्श्न ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे जाऊन श्री. राकेश चौधरी साहेब यांना भेटून मला लाच मागणी संबधी तक्रार दयावयाची असल्याचे सांगितल्याने त्यांनी आपणास बोलावून माझी तक्रारीची दखल घेणेसंबधी सांगितले. तेव्हा आपण तात्काळ 02 सरकारी पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार केल्याने श्रीमती मंगला रविकांत वसावे, महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय, नंदुरबार व श्री. सागर भास्कर सनंसे, महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय, नंदुरबार हे सरकारी पंच म्हणून हजर झाले. त्यानंतर आपण माझी, दोघेही सरकारी पंच व स्टाफ अशांची एकमेकांशी ओळख करुन दिली. त्यांनतर दोघेही सरकारी पंच यांनी मला तक्रारीसंबधी हकीकत विचारल्याने मी सांगितलेली तोंडी व लेखी हकीकत खालीलप्रमाणे, मी जिल्हा परिशद, नंदुरबार अंतर्गत महाराश्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रभाग समन्वयक, भरडू येथे काम पाहते व करंजी बुद्रूक, ता. नवापूर या गावचे प्रभारी प्रभाग समन्वयक म्हणून काम पाहते. श्री. दिनेश भामरे हे देखील जिल्हा परिशद, नंदुरबार अंतर्गत महाराश्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे काम करतात. ते चिंचपाडा प्रभागाचे प्रभाग समन्वयक व करंजी खुर्द ता. नवापूर येथे प्रभारी प्रभाग समन्वयक म्हणून काम पाहतात व मी त्यांना चांगल्याप्रकारे ओळखते.दिनांक 04/08/2022 रोजी मी पंचायत समिती, नवापूर येथे सी.आर.पी. (संमुदायिक संसाधन व्यक्ती) आढावा बैठकीच्या मिटींगकामी गेली होती. सदर मिटींग संपल्यानंतर श्री. दिनेश भामरे हे माझे जवळ आले व त्यांनी मला सांगितले की, तुमचा 11 महिन्यांचा करार संपला आहे. पुढील करार चालु ठेवण्यासाठी नुतनीकरण करावे लागणार आहे, त्यासाठी तु मला 10 किलो दे व सगळयांचे गोळा करून मला जमा करायचं आहे ऑफिसला देण्यासाठी. जर नाही दिले तर कराराचे नुतनीकरण होणार नाही आणि झाले तरी धडगावला जाण्याची तयारी ठेवावी लागेल, असे दिनेश भामरे यांनी मला सांगितले होते. त्यावेळी मला त्यांचे बोलणे समजले नाही मी पुन्हा त्यास मला काहीएक कळत नाही असे विचारल्यावर त्यांनी कराराचे नुतणीकरण करुन देणे व बदली सोयीचे ठिकाणी करुन देण्यासाठी 10,000/-रू. देणेबाबत सांगुन पैषांची मागणी केली होती. त्यानंतर मी त्यास पगार झाला नाही व आता माझेकडे पैसे नाहीत पुढे बघू असे सांगितले होते. दिनांक 11/08/2022 रोजी आपलं मानधन झालेलं आहे कृपया दिलेल्या दहा हजार



Scanned with CamScanner

रूपये प्रत्येकाने ट्रान्सफर करावे मला उद्या जिल्हा कक्षाला द्यावे लागतील असे श्री भामरे यांनी माझ्या मोबाईलवरील नवापूर सीसी ग्रुप या आमचे नवापूर ब्लकचे प्रभाग समन्वयक यांचे समन्वयासाठी बनविलेल्या व्हट्सअप गृपला मसेज केला होता. जर मी पुढील 11 महिने नुतनीकरणाच्या करारकरीता 10,000/-रूपये दिनेश भामरे यांना दिले नाही, तर माझे नुतनीकरण होणार नाही व माझा करार रद्द करुन मला कामावरुन काढून टाकतील किंवा माझी धडगावसारख्या दुर्गम भागात बदली करुन देतील, अषी माझी पुर्ण खात्री झाली आहे. परंतु मला त्यांना पैसे दयावयाचे नाही.त्यानंतर आज रोजी मला दिनेश भामरे यांचा फोन आला व पैष्याची मागणी करुन पैसे घेणेसाठी नंदुरबार येथे येतो असे सांगितले. मला त्यांना पैसे देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी माझे वरिश्ठ अधिकारी श्री. संजीवन संन्यासी (एम.आय.एस), पंचायत समिती, नवापूर यांना कळवून त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे आलेली आहे. तरी मी आपणांस माझे कराराचे आदेषाची प्रत तसेच व्हट्सअप गु्रपला श्री. दिनेश भामरे यांनी पाठविलेल्या मसेजचा स्क्रिनषट काढून त्याची छायांकित प्रत सादर केलेली आहे.तरी आज मी श्री. दिनेश भामरे यांचा फोन आल्यावर त्यांना भेटण्यासाठी नंदुरबार येथे त्यांनी बोलावलेल्या ठिकाणी जाणार आहे. ते मागत असलेले पैसे हे कोणतीही शासकिय फी अगर शासकीय देणे नसुन ते मागत असलेली रक्कम ही लाचच आहे, अषी माझी खात्री झाली आहे. त्यांना लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. माझे व बचत गटाचे प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांच्यात कोणतेही पुर्ववैमनस्य किंवा कोणतेही आर्थिक देवाण-घेवाणीचा उधार उसणवारीचा व्यवहार नाही. तरी माझ्याकडून लाच मागणारे बचत गटाचे प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही नम्र विनंती आहे. बाबत मी हस्तलिखीत तक्रार लिहुन दिल्यानंतर तक्रार आपण दोन्ही पंचांना वाचावयास दिली, ती तक्रार दोन्ही पंचानी वाचून त्या तक्रारीवर आपण व पंचांनी सहया केल्या. त्यांनंतर मी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांनी दिनांक 11/08/2022 रोजी त्यांचे मोबाईल क्रमांक 9423980526 वरुन नवापूर सीसी ग्रुप या नावाचे व्हट्सअप गृपला पाठविलेला आपलं मानधन झालेले आहे कृपया दिलेल्या दहा हजार रूपये प्रत्येकाने ट्रान्सफर करावे मला उद्या जिल्हा कक्षाला द्यावे लागतील अषा व्हट्सअप गृपला पाठविलेल्या मसेज आपणा सर्वांना दाखविला त्याचा आपण स्क्रिनषट काढून त्याची प्रिन्ट काढुन दोन्ही पंचासमक्ष हजर केली. त्यावर आपण व दोन्ही पंचांनी व मी सहया केल्या असुन सदर प्रत आपण ताब्यात घेतली होती. त्यानंतर सायंकाळी 05.55 वा.चे सुमारास मला श्री. दिनेश भामरे यांचा त्यांचे मोबाइल क्रमांक 9423980526 वरुन माझे मोबाइल क्रमांक 9766134938 वर फोन आला. त्यांनी मला जमजम चाईल्ड केअर हस्पिटल, जगताप नर्सरीजवळ, साक्री- नवापूर रोड, नंदुरबार याठिकाणी बोलाविल्याने मला लाचेची मागणी पडताळणीकामी पंच क्रमांक 01 श्रीमती मंगला वसावे यांचेसह पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच सदर पडताळणी दरम्यान मी माझे पती श्री.अजित करणसिंग वसावे यांना सोबत राहू देणेबाबत विनंती केल्याने व ते सोबत असल्यावर सापळा कारवाई दरम्यान कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, अषी खात्री करुन दिल्यावर मला माझे पती व पंच क्रमांक 01 यांचेसह लोकसेवक श्री. भामरे यांचेषी चर्चा करणेसाठी जाणेबाबत निर्णय घेण्यात आला. आपण लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवष्यक असल्याने आपले सूचनेवरुन मपोना/ज्योती पाटील यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हईस रेकर्डर व सनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी. 16 जी.बी.चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड बाहेर काढून ते डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर नं 1 ची निवड करुन दोन्ही पंच व मला दाखवून सदर डिजीटल व्हईस रेकर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आपण मला, माझे पती व दोन्ही पंच यांना पडताळणीदरम्यान घ्यावयाचे खबरदारीबाबत सूचना दिल्या व त्यानंतर श्री.दिनेश भामरे यांना भेटण्यासाठी त्यांनी बोलविलेल्या ठिकाणी नंदुरबार शहरातील धुळे चौफुली ते कोकणी हिल रोडवरील गाझी नगर जवळील जमजम चाईल्ड केअर हस्पिटलजवळ पाठविण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्यांनतर आपण मपोना/ज्योती पाटील यांना आपलेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर ताब्यात दिले ते त्यांनी माझे गळयातील मंगळसुत्रास धाग्याने बांधले व फोल्डर नं 1 ची निवड करुन ते सुरु केले व ते पंजाबी ड्रेसचे मध्ये टाकून वरून ओढणीने झाकले. ती वेळ 18.09 वाजेची होती. त्यांनतर मी व पंच क्रमांक 01 श्रीमती वसावे असे माझे ताब्यातील होण्डा कंपनीची अक्टीवा वाहन क्रमांक एम.एच. 13 सीसी 7405 हिचेने लाप्रवि, नंदुरबार कार्यालयातुन 18.10 वा. निघून नियोजनाप्रमाणे जगतापवाडी-उड्डाणपुल-धुळे चौफुली मार्गे जमजम हस्पिटल येथे जावुन वाहन हस्पिटलसमोर उभे केले. काही वेळाने माझे पती श्री वसावे तेथे आल्याने मी, पती व पंच क्रमांक 01 श्री. भामरे यांनी बोलावल्याप्रमाणे जमजम चाईल्ड केअर हस्पिटल येथील पहिले मजल्यावरील रिसेप्षन कक्षामध्ये गेलो. त्यावेळी श्री. दिनेश भामरे यांचेसोबत माझे सहकारी मोगराणी येथील प्रभाग समन्वयक श्री. विलास चव्हाण उपस्थित होते. त्यावेळी मी प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांचेशी कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांनी माझेकडे कराराचे नुतणीकरण व सोयीचे ठिकाणी बदली करुन देण्याचे मोबदल्यात सांगितले की, दहा हजार दयायचे तुम्हाला काही प्रब्लेम असेल तर कोणालाही विचारून घ्या....... नऊ नवशे पण नाही, दहा शंभर पण नाही, तुम्हाला दहा हजार द्यायचे आहेत तुम्हाला शक्य झाले तर ऑनलाईन ट्रान्सफर करा. असे बोलणे झालेवर मी, पती व पंच क्रमांक 01 श्रीमती वसावे असे आपण बोलावलेल्या ठिकाणी अन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार येथे परत आलो. त्यानंतर आपण पंच क्रमांक 01 श्रीमती वसावे मडम यांना विचारले की,आपणास व तक्रारदार अषांना नंदुरबार शहरातील धुळे चौफुली ते कोकणी हिल रोडवरील गाझी नगर जवळील जमजम चाईल्ड केअर हस्पिटल येथे बचत गटाचे प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांची भेट घेण्यासाठी ला.प्र.वि. नंदुरबार कार्यालयातुन रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं.1श्रीमती वसावे यांनी सांगितले की, मी,तक्रारदार व तक्रारदार यांचे पती असे शहरातील धुळे चौफुली ते कोकणी हिल रोडवरील गाझी नगर जवळील जमजम चाईल्ड केअर हस्पिटल येथे प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांची भेट घेण्याकरीता गेलो असता तक्रारदार श्रीमती नाईक यांनी श्री. भामरे यंाना फोनव्दारे जमजम हस्पिटल येथे आले असल्याचे संागितले असता श्री. भामरे यांनी बोलावल्याप्रमाणे जमजम चाईल्ड केअर हस्पिटल येथील पहिले मजल्यावरील रिसेप्षन कक्षामध्ये गेलो. त्यावेळी श्री. दिनेश भामरे यांचेसोबत एक इसम उपस्थित होते. श्री.भामरे, तक्रारदार श्रीमती नाईक यांचे बोलन्यातून सदर व्यक्ती ही त्यांची सहकारी असल्याचे व त्यांचे मुलाचे मेडीकल बिलाचे अनुशंगाने दिनेश भामरे हे सदर ठिकाणी आलेले असल्याचे समजले. त्यावेळी तक्रारदार यांनी प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांचेशी चर्चा केली असता चर्चे दरम्यान प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांनी तक्रारदार श्रीमती नाईक यांना कराराचे नुतणीकरण व सोयीचे ठिकाणी बदली करुन देण्याचे मोबदल्यात सांगीतले की, दहा हजार दयायचे तुम्हाला काही प्रब्लेम असेल तर कोणालाही विचारून घ्या. नऊ नवषे पण नाही, दहा षंभर पण नाही, तुम्हाला दहा हजार द्यायचे आहेत तुम्हाला शक्य झाले तर ऑनलाईन ट्रान्स्फर करा. अषी हकिकत संागितली. त्यानंतर आपण मला विचारल्याने मी देखील वरील हकिकतीप्रमाणे मिळतीजुळती हकिकत संागितली व श्री दिनेश भामरे यांचेसोबत मोगराणी येथील प्रभाग समन्वयक श्री. विलास चव्हाण हे असल्याबाबत सांगितले होते. त्यानंतर मी व प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांचेतील डिजीटल व्हईस रेकर्डर मधील फोल्डर नं. 1 मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण हे आपण, पंच नं. 1 श्रीमती मंगला वसावे व पंच नं. 2 श्री. सागर संनसे व माझेसमक्ष अन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे आपण सर्वानी ऐकले. सदर रेकर्डींग संभाशण ऐकुन त्या संभाशणाची स्क्रिप्ट पोना/संदीप नावाडेकर यांनी माझे व पंच नं. 1 श्रीमती वसावे यांचे मदतीने अन्टी करप्शन कार्यालय, नंदुरबार येथे तयार केली. त्यानंतर आपल्या सुचनेवरुन पोना/संदीप नावाडेकर यांनी ध्वनीमुद्रीत झालेले संभाशणाचे मेमरीकार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्येच ठेवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर संगणकास जोडणी करुन त्याची हॅश व्हॅल्यु काढुन, हॅश व्हॅल्यु सर्टीफिकेटची प्रिंट काढुन दोन्ही पंच व आपण सहया करुन ते कागदपत्रात समाविष्ट केले व मेमरीकार्ड पांढÚया कागदावर लेबल तयार करुन



Scanned with CamScanner

त्यावर दोन्ही पंच व आपण सह्या करून खाकी पाकीट कार्यालयीन सीलने लाखेने सिलबंद केले. ते आपण ताब्यात घेतले.

त्यानंतर माझे प्रभाग समन्वयक (जिल्हा परिशद, नंदुरबार अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान) चे कराराचे 11 महिण्याचा कालावधी संपलेला असल्याने माझी सेवा पुढे सुरळीत ठेवण्यासाठी प्रभाग समन्वयक श्री. दिनेश भामरे यांनी लाच म्हणुन "दहा हजार दयायचे तुम्हाला काही प्रॉब्लेम असले तर कोणालाही विचारून घ्या...... नऊ नवषे पण नाही, दहा षंभर पण नाही, तुम्हाला दहा हजार द्यायचे आहेत तुम्हाला शक्य झाले तर ऑनलाईन ट्रान्स्फर करा." अषी 10,000/-रुपये लाचेची रक्कम मागणी केल्याचे पंचसाक्षीदारासमोर केलेल्या पडताळणीमध्ये स्पष्ट झाले आहे.

तरी आपण मला पंचासमक्ष पुढील यशस्वी सापळा कारवाईबाबत विचारणा केली असता, मी आपणास श्री. दिनेश भामरे हे दिनांक 13/08/2022 ते दिनांक 16/08/2022 रोजीपावेतो षासकिय सुट्टी असल्याने पंचायत समिती, नवापूर येथे येणार नाहीत, असे कळविले होते. तरी कार्यालयीन कामकाज असेल त्या दिवषी मी फोन करेल तेव्हा पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यानंतर दिनांक 17/08/2022 ते दिनांक 22/08/2022 रोजी आपण मला पुढील कारवाईकरीता वेळोवेळी फोनव्दारे संपर्क साधुन बोलाविले असता, दिनांक 17/08/2022 रोजी प्रभागात काम असल्याने व त्यानंतर मी तीन महिन्याची गर्भवती असल्याने सदर दिवषी माझी पावसामुळे अचानक तब्येत खराब झाल्याने मी येवू शकली नाही. दिनंाक 18/08/2022 रोजी मी आपणास माझी पंचायत समिती, शहादा येथे जिल्हा अभियान व्यवस्थापक यांचेव्दारे आढावा बैठक होणार असलेबाबत फोनव्दारे कळविले होते. दिनांक 19/08/2022 रोजी माझी परत तब्येत खराब झाली. दिनांक 20/08/2022 व दिनांक 21/08/2022 रोजी शनिवार व रविवार निमीत्त षासकिय सुट्टी व दिनंाक 22/08/2022 रोजी माझी पंचायत समिती, नवापूर येथे आढावा बैठक असल्याचे आपणांस फोनव्दारे कळविले होते.

दिनांक 23/08/2022 रोजी मी अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात आल्यावर आपण पुन्हा दिनांक 12/08/2022 रोजी आलेल्या पंचांना पाचारण केले असता यापुर्वी आलेले पंच श्रीमती मंगला रविकांत वसावे, महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय, नंदुरबार व श्री. सागर भास्कर संनसे, महासुल सहाय्यक, तहसिल कार्यालय, नंदुरबार असे अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार कार्यालयास हजर झाले.

दोन्ही पंचासमक्ष आपण मला पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी आपणांस सांगितले होते की, "दिनांक 18/08/2022 रोजी आमचे जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री. यशवंत ठाकूर यांनी शहादा येथील पंचायत समिती कार्यालय येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर बैठक 11.00 वा ते दुपारी 3.30 वा पावेतो होती. बैठकीकरीता संपूर्ण जिल्हयाचे तालुका समन्वयक व प्रभाग समन्वयक उपस्थित होते. मी देखील सदर बैठकीस उपस्थित होती.

दिनांक 18/08/2022 रोजी दुपारी 3ः30 वाजेचे सुमारास आढावा बैठक संपल्यानंतर मी व इतर सर्व समन्वयक शहादा पंचायत सनितीचे बाहेर येवून चर्चा करीत असतांना दिनेश भामरे हे आमचेजवळ आले व त्यांनी सांगितले की," मी यापूर्वी नंदूरबार व तळोदा तालुक्याचे प्रभाग समन्वयक यांना कराराचे नुतनीकरण करणेसाठी 10,000/- रुपये संािगतले होते, तरी उर्वरित तालुक्याचे प्रभाग समन्वयक यांनी देखील नुतनीकरणासाठी 10,000/- रुपये गुगल पे किंवा फोन पे व्दारे मला ट्रान्सफर करावेत अथवा मला रोख स्वरुपात द्यावेत, म्हणजे मी सर्वांचे पैसे जमा करुन जिल्हा कक्षाला देईन." असे सांगितल्यावर तेथे उपस्थित असलेले श्री. बन्सीलाल महाले, प्रभाग समन्वयक, धडगाव यांनी दिनेश भामरे यांना सांगितले की," मी 06-07 वर्षापासून प्रभाग समन्वयक म्हणून काम करीत आहे, परंतु आजपावेतो माझ्याकडे अथवा आमचेपैकी कोणाकडून अषाप्रकारे पैषंाची मागणी कधीही झालेली नाही, मी पैसे देणार नाही, तुम्हाला काय करायचे ते करुन घ्या." असे सांगितल्यावर तेथे उपस्थित असलेले धडगाव तालुक्याचे उर्वरित सर्व प्रभाग समन्वयक तसेच इतर तालुक्याचे सर्व प्रभाग समन्वयक यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर सर्वांचा विरोध पाहून श्री. दिनेश भामरे यांनी तेथे उपस्थित असलेल्या सर्व प्रभाग समन्वयक यांना सांगितले की, "ठिक आहे, मग कोणीच पैसे देऊ नका. मला यापूर्वी ज्यांनी पैसे रोख स्वरुपात अथवा माझे अकाउंटला ट्रान्सफर केलेले आहेत, त्यांचेदेखील पैसे मी परत देतो. मी आता कोणाचेही पैसे स्विकारणार नाही व तसेच जिल्हा कक्षाला कळवतो. जे असेल ते नियमाप्रमाणे होऊ द्या." असे सांगितल्यावर आमचेपैकी एकजण भामरे यांना म्हणाले की," जिल्हा कक्षात कोणाला पैसे पाहिजे, आम्हाला सांगा, आम्ही त्यांना भेटतो" हे एकून श्री. भामरे हे काहीएक न बोलता तेथून निघून गेले.

तरी दिनांक 12/08/2022 रोजी श्री. दिनेश भामरे यांनी माझेकडे मागणी केलेले 10,000/- रुपये ते आता स्विकारणार नाहीत व पुन्हा भविश्यात पैषांची मागणीदेखील करणार नाहीत, अषी माझी आता पुर्णपणे खात्री झालेली आहे. तरी मी दिलेल्या तक्रारीबाबत आपण योग्य तो निर्णय घ्यावा." याप्रमाणे हकिकत सांगून माझा पुन्हा स्वहस्ताक्षरात जबाब लिहून दिला. सदर जबाब दोन्ही पंचांनी वाचून त्यावर दोन्ही पंच व आपण स्वाक्षरी केलेली आहे.

तरी भविष्यात माझेकडून गै.अ. श्री. दिनेश दिलीप भामरे हे त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत अषी माझी, पंचांची व आपली खात्री झालेली असल्याने सदर कारवाई स्थगित करण्याचे ठरविण्यात आले व तसा स्थगित सापळा पंचनामा दिनांक 23/08/2022 रोजी 13.30 ते 17.00 वा पावेतो करण्यात आलेला होता.

तरी दि.12/08/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान श्री.दिनेश दिलीप भामरे, प्रभाग समन्वयक (कंत्राटी), बचत गट चिंचपाडा प्रभाग व करंजी खुर्द (प्रभारी), ता. नवापूर (जिल्हा परिशद, नंदुरबार अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) यांनी माझेकडे कामासंबंधाने बोलणी दरम्यान कराराचे नुतणीकरण व सोयीचे ठिकाणी बदली करुन देण्याचे मोबदल्यात "दहा हजार दयायचे तुम्हाला काही प्रॉब्लेम असेल तर कोणालाही विचारुन घ्या...... नऊ नवषे पण नाही, दहा षंभर पण नाही, तुम्हाला दहा हजार द्यायचे आहेत तुम्हाला शक्य झाले तर ऑनलाईन ट्रान्स्फर करा." असे बोलून जिल्हा कक्ष, जि. नंदुरबार (महाराश्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा परिशद, नंदुरबार) यांचे नावाने 10,000/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेषीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणेप्रमाणे आपण संगणकावर टाईप केलेली असून ती मी वाचून पाहिली, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टाईप केलेली आहे.



Scanned with CamScanner

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kirankumar bhimrao khedkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name (नाव):** kirankumar bhimrao khedkar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

HC-836.
पोलीस ठाणे अमलदार
नंदुरबार शहर पो.स्टे.

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
नंदुरबार शहर पो.स्टे.



Scanned with CamScanner

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एकं किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner